ePaper

# 'सर्वोच्च' निकाल सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा: उद्धव ठाकरे



| वर्ष - 7 । अंक -18 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com । रविवार, दि. 14 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘नो रिझल्ट नो ॲपॉर्च्युनिटी!’

## कर्नाटक निकालातून भाजपा बोध घेणार काय?

### केवळ हिंदूत्व नव्हे, तर विकासाच्या मुद्यांवर राजकारण हवे

### बिनकामाच्या नेत्यांना घरी बसवा, सक्रीय नेत्यांना संधी द्या




। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजकीय मास लीडर नेत्यांना डावलल्याचा किंवा त्यांच्या नाराजीचा फटका भाजपाला कर्नाटक विधानसभा निवडणुकीत बसला. केवळ हिंदूत्व किंवा अध्यात्माच्या मुद्यांवर निवडणुका लढवता आणि जिंकता येणार नाहीत. तर विकासाचे मुद्दे हातात घेतले पाहिजेत. यासह महत्त्वाचे म्हणजे, बिनकामाच्या नेत्यांचा पक्षातील वरचष्मा कमी करून , 'मास लीडर' नेत्यांना ताकद दिली पाहिजे. अन्यथा केवळ मोदी-शहा यांच्या नावावर मते मिळणार नाहीत. स्थानिक नेतृत्वाला व्यापक संधी दिली पाहिजे, असा सूचक संदेश भाजपाला मिळाला आहे.**

कर्नाटक निवडणूक निकालानंतर आगामी लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांसाठीही भाजपाच्या प्रदेश आणि राष्ट्रीय नेतृत्वाला आत्मचिंतन करावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा करिष्मा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या संघटन कौशल्याच्या जोरावर सर्व निवडणुका जिंकता येतील, असा आत्मविश्वास भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला होता. त्याला कर्नाटकमध्ये तडा गेला आहे.

लोकसभा सभागृहातील बहुमत आणि देशातील सर्वच राज्यांमध्ये 'निवडणूक मॅनेजमेंट' यशस्वी करता येईल. किंवा पैसा आणि विविध सुरक्षा यंत्रणांच्या आधारे फोडाफोडी करुन सत्ता स्थापन करता येईल, असा दावा आणि अहंकार भाजपाला झाला. तो सर्वसामान्य नागरिकांना कदापि रुचलेला नाही.

याउलट, क्षमता असताना प्रभावी नेतृत्वाला संधी न देता केवळ पक्षात काम केले म्हणून अमर्याद अधिकार एखाद्या नेत्याला बहाल करायचे आणि त्याकरवी सत्ता चालवायची, असा पायंडा अहितकारक ठरला आहे.

### स्थानिक नेत्यांना डावलल्याचा फटका..?

» कर्नाटकमध्ये भाजपा सत्तेवर असूनही काँग्रेस आणि जेडीयूचे आव्हान मोठे असल्याने भाजपाने राज्यातील स्थानिक नेत्यांचा योग्य सन्मान ठेवणे आवश्यक होते. पण ते न झाल्याने माजी मुख्यमंत्री बी. एस. येडीयुरप्पा हे नाराज होते.

» भाजपा केंद्रीय संसदीय समिती आणि केंद्रीय निवडणूक समितीत येडीयुरप्पांना स्थान आहे.

» मात्र कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील रणनीती, उमेदवार निश्चिती आणि प्रचार यात त्यांना फारसे स्थान देण्यात आले नव्हते, अशा अनेक स्थानिक नेत्यांच्या नाराजीचा फटका भाजपाला बसला, असे राजकीय जाणकार सांगतात.

### महाराष्ट्रासाठी सूचक इशारा...

» महाराष्ट्रातील आगामी निवडणुकांच्या दृष्टीनेही भाजपाला हा सूचक इशारा आहे. शिंदे-फडणवीस सत्ता स्थापन झाली. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपद देण्याऐवजी केंद्रीय नेतृत्वाने उपमुख्यमंत्रीपद दिले.

» केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना राज्यातील राजकारण आणि निवडणूक निर्णय प्रक्रियेपासून शक्यतो दूर ठेवले जाते.

» काँग्रेसचा प्रत्येक निर्णय ‘ हाय कमांड ’ ला विचारून होतो, अशी टीका भाजपाने नेहमीच केली. पण आता भाजपामध्येही स्थानिक नेत्यांशी चर्चा न करता किंवा त्यांच्या मताला किंमत न देता केंद्रीय आणि राज्यातील नेत्यांकडून निर्णय घेतले जातात.

### प्रभावहिन लोकांचा संघटनेवर वरचष्मा...

» हिच परिस्थिती पुणे, पिंपरी-चिंचवडमध्येसुद्धा आहे. जुने, निष्ठावंत म्हणून अनेकांना मानाची आणि अधिकाराची पदे बहाल करण्यात आली आहेत. मात्र, या नेत्यांचा लोकप्रभाव नगण्य आहे. याउलट, क्षमता असतानाही काही नेत्यांना संधी दिली जात नाही. स्थानिक पातळीवर एखादा महत्त्वाचा निर्णय घेताना विश्वासात घेतले जात नाही. केवळ पक्षशिस्त आणि पक्षाचा आदेश यावर एखादा निर्णय लादला जातो. त्यामुळे क्षमता असतानाही काही नेते ‘नरो वा कुंजरो वा’ च्या भूमिकेत असतात. संघटनेत महत्त्वाच्या पदांवर लोकाश्रय नसलेल्या आणि केवळ भाजपाच्या पक्षश्रेष्ठींची मर्जी म्हणून अनेक अधिकार पदांवर ठाण मांडलेल्या निष्क्रीय लोकांमुळेच भाजपाचा पाय खोलात आहे. त्यामुळे संघटना किंवा निवडणूक ‘नो रिझल्ट नो ॲपॉर्च्युनिटी’ या सूत्रानुसार काम केले पाहिजे, अशी भावना सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधून व्यक्त होते आहे.

### स्थानिक नेत्यांना संधी मिळाली पाहिजे...

» नाजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आदी नेत्यांनी प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आदी नेत्यांना नेतृत्वाची संधी दिली आणि मोठे होऊ दिले. मात्र आता प्रदेश नेते डोईजड होऊ नयेत, यासाठी पक्षश्रेष्ठींकडून पंख छाटले जातात, अशी भावना काही नेत्यांमध्ये आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये अशीच परिस्थिती आहे. केवळ मोदी-शहा यांच्या चेहऱ्यावर मते मागून निवडणुकीत यश मिळणार नाही किंवा धार्मिक मुद्दे पुढे करुनही निवडणुका जिंकता येणार नाहीत. याउलट, शहरांच्या विकासाचे मुद्दे हातात घेवून स्थानिक निष्ठावान आणि बलशाली नेत्यांना संधी दिली आणि निर्णय स्वांतत्र्य दिले. ताकद दिली तर, निश्चितपणे लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत वर्चस्व राखता येईल.

# मुळशीसारखाच मावळ पॅटर्न रोखण्याचं पोलिसांसमोर आव्हान!

## जसं आवारेंना मारलं, तसं आ. शेळकेंच्या भावालाही संपवलं होतं, तो रक्तरंजित इतिहास पुन्हा ताजा

।मावळ, पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांच्या हत्येने मावळ तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्हा हादरला आहे. राजकीय वैमनस्यातून हत्या झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येतोय. दीड महिन्यांपूर्वी शिरगावचे राष्ट्रवादीचे सरपंच प्रवीण गोपाळे यांचीही अशीच हत्या झाली. त्यामुळे मावळमधील रक्तरंजीत इतिहासाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आवारे खून प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, त्यांचे बंधू सुधाकर शेळके यांच्यासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आवारेंच्या हत्येनंतर आमदार सुनील शेळके यांच्या भावाची हत्येचीही चर्चा होतीये. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी आमदार सुनील शेळके यांचे बंधू सचिन शेळके यांचीही अशीच हत्या झाली होती, अन् त्यावेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे आवारे यांच्या खुनाने सचिन शेळके यांच्या खुनाच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत.**





आमदार सुनील शेळके यांचे बंधू सचिन शेळके हे २०१६ साली भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक होते. वयाच्या अवघ्या ३८ वया वर्षी त्यांची भर रस्त्यात अज्ञात हल्लेखोरानी त्यांचा निर्घृण खून केला होता. हा खून ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झाला होता. त्यावेळी सचिन शेळके यांच्यावर देखील पाळत ठेवून हा खून करण्यात आला होता. त्यावेळी बाळा भेगडे आमदार असताना त्यांनी आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा मिळावी यासाठी प्रयत्न केले होते.

सचिन शेळके यांचा देखील तळेगाव येथील पेट्रोल पंपासमोरच हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. तसेच सत्तुराने वार केले केले होते. त्यानंतर हल्लेखोर पळून गेले. नागरिकांनी गंभीर जखमी झालेल्या शेळकेंना पवना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी तळेगावमध्ये तणावाचे वातावरण होते.

पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता. आवारे यांच्या खुनाने मात्र माजी नगराध्यक्ष सचिन शेळके यांच्या खुनाच्या आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या.

सचिन शेळके यांची भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी भारतीय जनता पक्षांचे शहराध्यक्षपद भूषविले होते. तसेच नगरसेवक, उपनगराध्यक्ष, पक्षप्रतोद आणि २००९-२०१० मध्ये त्यांनी नगराध्यक्षपद भूषविले आहे. प्रभाग क्रमांक एक मधून शेळके निवडणुकीसाठी इच्छुक होते.

### दीड महिन्यांपूर्वी राष्ट्रवादीच्या सरपंचाचा खून

» दीड महिन्यांपूर्वी शिरगावचे सरपंच प्रवीण गोपाळे यांचीही आवारेंप्रमाणेच निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनांमुळे मावळ तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

» त्यामुळे दिवसेंदिवस मावळ तालुक्यात गुन्हेगारी डोके वर काढत असल्याचे पाहायला मिळत आहे. मावळात पुन्हा एकदा खुनाचे सत्र झाले आहे.

» त्यामुळे मावळ तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुळशीसारखाच मावळ पॅटर्न रोखण्याचं आव्हान आता पिंपरी चिंचवड पोलिसांसमोर असणार आहे.

---

# पोलिस यंत्रणेला माझं पूर्ण सहकार्य – आ. सुनील शेळके

## तळेगावातील किशोर आवारे हत्याकांडाला राजकीय वळण; 24 तासांच्या आत चौघांना अटक

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांच्या हत्ये प्रकरणाला आता वेगळं वळण मिळालं असून राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांच्यासह श्याम निगडकर, सुधाकर शेळके, संदीप गराडे व इतर ३ अनोळखी इसम अशा सात जणांवर हत्येच्या कटात सहभागी झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर चोवीस तासांच्या आत तळेगाव दाभाडे पोलिसांनी चौघांना अटक केली आहे.**

दरम्यान राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण दिले आहे. किशोर आवारे यांच्यासोबत राजकारणामध्ये एकत्रितपणे काम केलं. आमच्या विचाराच्या माध्यमातून मतभेद असतील पण मनभेद नव्हते. परंतु, काही मंडळी यामध्ये जाणीवपूर्वक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अस कोणी करत असेल तर ते कोणी करू नये. या घटनेला राजकीय वळण देऊ नका असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. पोलिस यंत्रणेला मी पूर्ण सहकार्य करत आहे. अस ते म्हणाले आहेत.



किशोर आवारे यांची शुक्रवारी दुपारी गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली. यानंतर या घटनेला वेगळे वळण मिळत आहे. आमदार सुनील शेळकेसह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपावर आमदार सुनील शेळके यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी हे आरोप फेटाळले आहे. ज्या व्यक्तीचा या हत्येच्या पाठीमागे हात आहे त्याला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी.

आमदार सुनील शेळके म्हणाले, ‘काल दुपारी जनसेवा विकास समितीचे संस्थापक किशोर आवारे यांची नगरपालिकेच्या आवारामध्ये दुपारी हत्या करण्यात आली. या हत्येचा, घटनेचा जाहीर तीव्र शब्दांमध्ये निषेध व्यक्त करतो. कालची घटना झाली त्या घटनेनंतर आज सकाळी सात वाजता सुनील शेळके नोटरीचेबल, फोन स्विच ऑफ अशा पद्धतीने माध्यमाने ज्या काही बातम्या लावण्याचे काम केलं त्या अनुषंगाने आत्ता मी पत्रकार परिषद या ठिकाणी घेत आहे.

### खरे सूत्रधार कोण

» “मागील काही दिवसापूर्वी किशोर आवारे असतील किंवा आम्ही असू राजकारणामध्ये एकत्रितपणे काम केलं. परंतु, आमचे विचार मतभेद असतील परंतु मनभेत नव्हते. काही मंडळी यामध्ये जाणीवपूर्वक राजकारण करण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर कृपया करून अशा घटनेला राजकीय वळण देऊ नका. घटनेची सत्यता समाजापुढे न्याय देवता आणि पोलीस यंत्रणा आणल्याशिवाय राहणार नाही. म्हणून कालच्या घटनेमध्ये संध्याकाळी जी काय नोंद करण्यात आली त्यामध्ये माझं स्वतः सुनील शेळके माझा भाऊ सुधाकर शेळके संदीप गराडे आणि इतर काही अशा व्यक्तींकडून हत्येचा कट करण्यात आला त्यामध्ये सांगण्यात आलं. परंतु, ही फिर्याद देत असताना शेवटी एखाद्या कुटुंबातला व्यक्ती गेल्यावरती त्या परिवाराची भावना देखील तीव्र असते हे आम्ही समजू शकतो. परंतु, त्या मागचे खरे सूत्रधार कोण आहेत कोण हे सगळं घडवत हे कोण जाणीवपूर्वक बदनामी करण्याचा प्रयत्न करतो हे देखील आम्ही पुढील काळामध्ये शोध घेऊन तो नक्कीच जनतेपुढे आणल्याशिवाय राहणार नाही.”

# सिंग इज अलवेज किंग!

## प्रशासकीय कारभारात नो पॉलिटिकल इंटरफेरन्स : उन्मत अधिकाऱ्याला शिकवला धडा

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**प्रशासकीय अधिकाऱ्यांनी राजकीय लोकप्रतिनिधी असल्याप्रमाणे किंवा त्यांचा कलाने भूमिका घेता कामा नये. व्यापक लोकहित हीच भूमिका अधिकाऱ्यांची असली पाहिजे. केवळ राजकीय वरदहस्त आहे म्हणून कुणाचीही आरेरावी आणि उन्मतपणा खपवून घेतला जाणार नाही, असा सूचक संदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे.**






पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासकीय कारभारात राजकीय ढवळाढवळ नवी नाही. काही राजकीय लोकांच्या वरदहस्तामुळे अनेक अधिकारी आणि अ- वर्गातील कर्मचारी यांचा उन्माद गेल्या काही वर्षांमध्ये कमालीचा वाढला आहे. कोणीही आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त असुदेत... आपला नेता आपल्या पाठिशी असल्यास कोणाचीही मजल नाही... आपल्या विरोधात कारवाई करण्याची... असा अहम अनेक अधिकाऱ्यांमध्ये दिसतो. त्यांच्या चालण्या-बोलण्यात आणि एकूण वर्तनात प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळेच “अमूक अधिकारी या नेत्याच्या जवळचा... तमूक अधिकारी त्या नेत्याच्या जवळचा... हा मर्जितला... हा खास- डावा आणि उजवा हात...” असे विभागनिहाय वर्गीकरण करता येईल, अशी यादी आहे. पण, हे सर्व अधिकारी जनतेचे सेवक आहेत. महापालिका प्रशासनाने सेवक आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

महापालिका प्रशासकीय राजवट लागू झाली. त्यावेळी आयुक्त राजेश पाटील होते. त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या मर्जितील अधिकारी असा शिक्का होता. त्यानंतर शेखर सिंह आले. प्रशासक आणि आयुक्त म्हणून राजकीय समतोल साधत असतानाच शेखर सिंह यांनी ‘प्रशासकीय कंट्रोल’ही कौशल्यपूर्णपणे हाताळला आहे. वर्षानुवर्षे एकाच पदावर आणि राजकीय पाठबळाने ‘गब्बर’ झालेले अधिकारी आयुक्तांना जुमानत नाहीत, असा एक प्रकार नुकताच घडला.

प्रशासक राजवट असताना आयुक्त शेखर सिंह यांनी इंटरनेट केबल डक्ट आणि भामा आसखेड प्रकल्पातील जॅकवेलच्या कामाला स्वत:च्या अधिकारात मंजुरी दिली. त्याचे राजकीय पडसाद उमटले. या कामांना स्थानिक राजकारणातील काही लोकांनी विरोध केला. आंदोलने, मोर्चे, पत्रकार परिषदांचा धडाका झाला. त्यामुळे प्रशासनाची प्रतिमा मलीन झाली. वाद निर्माण झालेले विषय आयुक्तांनी अधिकारांचा वापर करीत रेटून नेले. त्याला ‘व्यापक जनहित’ असा आधार दिला. पण, जे विषय प्रशासनाने हातात घेतले. त्याची माहिती प्रकल्प जाहीर करण्यापूर्वीच विशिष्ट अधिकाऱ्यांमार्फत विशिष्ट राजकीय नेत्यांपर्यंत पोहोचवली जात होती. त्यामुळे राजकीयदृष्ट्या मिळालेला खुराक आणि त्याद्वारे राजकीय स्टंटबाजी केली जात आहे, ही बाब आयुक्त शेखर सिंह यांच्या लक्षात आली. आयुक्तांनी ‘फिल्डिंग’ लावली आणि माहितीवाहक शोधून काढला. नुसता शोधून काढला नाही, तर चांगलाच धडा शिकवला. त्यामुळे “एकावर प्रहार आणि सगळे गार” अशी स्थिती पालिकेत आहे. तर प्रामाणिक अधिकारी मात्र ‘सिंग इज अलवेज किंग’ असा दावा करीत आनंद साजरा करीत आहेत.

### अधिकारी अन् आयुक्तांमधील ‘तो’ संवाद...

संबंधित अधिकाऱ्याने राजकीय व्यक्तींना हेतुपुरस्सर वादग्रस्त प्रकल्पांची माहिती दिली होती. त्यामुळे राजकीय मुद्दा झाला. यावर असे का केले? असा सवाल आयुक्तांनी त्या अधिकाऱ्याला दालनात बोलावून केला. “आपण असे करु नका... प्रशासकीय माहिती लोकप्रतिनिधींना दिली, तर त्याचा राजकीय वापर होत आहे. विकासकामांवर परिणाम होत आहे. विनाकारण, महापालिका प्रशासनाची बदनामी होत आहे...” अशाप्रकारची कानउघडी आयुक्तांनी केली. पण, “ते सन्माननीय सदस्य आहेत. त्यांचा दबाव असतो आमच्यावर त्यामुळे माहिती द्यावी लागते...” असे प्रत्युत्तर त्या मुजोर अधिकाऱ्याकडून मिळाले. आयुक्तांचा संताप अनावर झाला. आयुक्त म्हणाले... “मी तुमच्या चुकीबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावू शकतो.” त्या अधिकाऱ्याकडून आयुक्तांना धक्कादायक उत्तर मिळाले... “आपण हवी ती कारवाई करु शकता.” आता आयुक्तांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. आयुक्तांनी शांतपणे त्या अधिकाऱ्याच्या ‘विभाग प्रमुख’ अधिकाऱ्याला संपर्क केला. या बेताल अधिकाऱ्यांची काही फाईल आहे का? अशी विचारणा केली. फाईल बाहेर निघाली... आणि निवृत्तीसाठी काही पाच-सहा वर्षे बाकी असताना त्या अधिकाऱ्याला मानधनावर काम करण्याची वेळ आली. कोणत्याही महापालिका सुविधा नाही, ११ महिन्यांचा करारावर काम करण्याची नामुष्की केवळ राजकीय व्यक्तींच्या नादी लागून अधिकारांचा गैरवापर केल्यामुळे त्या अधिकाऱ्यावर आली. या घटनेतून महापालिकेतील स्वयंघोषित नगरसेवक अधिकाऱ्यांनी बोध घेतला पाहिजे, अशी चर्चा महापालिका अधिकाऱ्यांमध्ये सुरू आहे.

### बेताल बादशाहांना सूचक संदेश...

अधिकारांपेक्षा मोठा... आणि नगरसेवकांच्या मर्जितला म्हणून... वावरणारे अनेक अधिकारी सध्या महापालिकेत ‘बेताल बादशाह’ झाले आहेत. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त दोन-तीन वर्षांत येतात आणि जातात. पण, त्याचा आपल्यावर काही परिणाम होणार नाही, अशा अविर्भावात अनेकांनी महापालिका म्हणजे आपले ‘संस्थान’ बनवले आहे. राजकीय वरदहस्ताने अधिकारांचा गैरवापर करताना अधिकारी स्वत: नगरसेवक असल्यासारखे वर्तन करीत आहेत. अशा अधिकाऱ्यांमुळे महापालिका आणि पिंपरी-चिंचवड शहराला काळींमा फासला जात असून, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतलेली कठोर भूमिका ही निश्चितच आगामी काळात लाभदायी ठरणार आहे. महापालिका चालवणारेच मालक झाले, तर राजकीय लोकप्रतिनिधींनाही जुमानणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे, वर्षानुवर्षे प्रामाणिक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना बगल देण्याची भूमिका राजकीय नेते करतात आणि आपल्या मर्जितील अधिकारी महत्वाच्या पदांवर बसवतात. मात्र, ते अंतिम निर्णायक नाहीत, असा सूचक इशारा आयुक्तांनी आपल्या कृतीतून दिला आहे.

# 'भाजप हटाव देश बचाव' ला कर्नाटक मधून प्रारंभ !

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचा हल्लाबोल

।पिंपरी । महाईन्यूज ।

**महागाई, भ्रष्टाचार आणि जातीय राजकारणाला कंटाळलेल्या कर्नाटकमधील जनतेने भारतीय जनता पक्षाला विधानसभा निवडणुकीत चोख उत्तर दिले आहे. ‘भाजप हटाव देश बचाव’ला कर्नाटक मधून प्रारंभ झाल्याचा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केला आहे.**



कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस एकहाती सत्ता काबीज केली आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात गव्हाणे यांनी म्हटले आहे की, देशातील लोकांचा मुड बदलत आहे. मोदी सरकारवर जनतेचा विश्वास राहिला नाही. त्यामुळे देशात मोदी सरकारविरोधात जनमत तयार होत आहे. याचा प्रत्यय कर्नाटक विधानसभा निकालातून आला आहे. तसेच आगामी लोकसभा आणि राज्यातील 2024 च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनताही भाजप आणि शिंदेसेनेला धडा शिकविणार आहे, असल्याचेही गव्हाणे म्हणाले.

### भाजपला बजरंग बली पावण्याचा विषयच येत नाही : इम्रान शेख

कर्नाटक चा निकाल बघता बजरंग बली हे अन्याय विरोधात कायम सत्या सोबत राहिल्याचे रामायण सांगते. त्यामुळे जाती-धर्मा वरून समाज तोडणाऱ्या भाजपला बजरंग बली पावण्याचा विषयच येत नाही असे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष इम्रान शेख यांनी कर्नाटकात भाजपचे पराभवानंतर दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हंटले आहे. देशाच्या जनतेने ठरवले तर मीडिया द्वारे केला गेलेला आक्रमक प्रचार, चित्रपटाद्वारे पेरला गेलेला विखार, खोटे बोल पण रेटून बोल ची नीती, सरकारी यंत्रणांचा केलेला दुरुपयोग सर्व काही निष्प्रभ ठरून सत्याचा विजय होऊ शकतो. त्याच प्रमाणे एकदा जनतेने विकासावर मतदान करायचे ठरवल्यावर बी टीम,सी टीम, ते झेड टीम सर्वांचा बाजा वाजू शकतो हा कर्नाटकातील जनतेने देशाला दिलेला कौल आहे. विरोधी पक्ष एकत्र आले तर धर्माच्या नावा खाली देश विकणारे,द्वेष पसरवणारे कुठेही टिकू शकत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले..



# छान टाईमपास सुरु; चिंतनाला वेळ नाही!




गेल्या काही वर्षात जगात आणि आपल्या भवताल पण सगळ्याच अर्थाने बदल झाला आहे.आपल्या मेंदूमधील जग,समाज आणि वास्तवातील जग कमालीचे वेगळे आहे हे समजायला अजूनही कोट्यवधी लोकांना त्रास होतोय. बालपणी झालेले संस्कार, त्यानुसार आपल्या भोवती निर्माण झालेले जग आणि प्रत्यक्षात असलेले जग यात कमालीची तफावत असल्याचे वास्तव कित्येकांना अजूनही पटत नाही. कुण्यातरी देवाच्या परवानगीशिवाय झाडाचे पानही हळू शकत नाही असे ज्यांना वाटते त्यांना " कृत्रिम बुद्धिमत्ता " कशी काम करते याचे प्रात्यक्षिक दाखवले तर हेच लोक कोमात जातील अशी अवस्था आहे. आपला समाज फारच अजब आहे . अजूनही बेलाचे पान महादेवाच्या पिंडीवर वाहिल्याशिवाय ज्यांचा पोटोबा होत नाही अश्या अज्ञानात जगणारा मोठा वर्ग आणि दुसरीकडे आधुनिक विज्ञानाच्या शोधांवर आपले आणि सोबतच समाजाचे भले करणारे लोक सुद्धा याच समाजाचा भाग आहेत.

आकलन,दूरदृष्टी आणि तर्क या बाबींचा एवढ्यात जो दुष्काळ पडला आहे ना त्याने कमाल केली आहे. चांगला शिकलेला माणूस रस्त्याने जाताना कुण्या अनोळखी व्यक्तीने अडवले तर सहज थांबतो आणि त्याच्या हात चालाखीला सहज बळी पडतो. अलीकडे शिकलेली माणसे चाणाक्ष लोकांचे आवडते खाद्य बनले आहेत. शिकलेली माणसे जेवढ्या लवकर बळी पडतात तेवढी अडाणी माणसे हाताला फारशी लागत नाहीत असे समाजात सर्रास दिसायला लागले आहे. कुणालाही भूतकाळात डोकावून बघायचे नाही आणि फार पुढचा सुद्धा विचार करायचा नाही असे जणू सगळ्यांनी ठरवून टाकले आहे याचा संशय येतो. विचार करण्याची ताकद कमजोर झाली आहे असे वाटते. मेंदूवर अलीकडे कुणालाच जोर द्यावासा वाटत नाही. थोड्याश्या तणावाने सुद्धा मेंदू लुळे पडायला लागले आहेत त्यामुळे समाजात काहीही घडले तरी त्याचा लोड आपण तरी का घ्यावा हा मतलबी विचार करणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

मोदीजी यांच्या " मन कि बात " चे शंभर भाग नुकतेच झाले ,त्या निमित्ताने कुणाच्याही हे लक्षात आले नाही की पहिला भाग जेव्हा प्रसारित झाला तेव्हा घरात येणारे गॅस



सिलिंडर अवघ्या ३२० रुपयात मिळत होते आणि शंभराव्या भागाला तेच सिलिंडर १३०० रुपयाला घरात प्रवेश करायला लागले. मागे जाऊन विचारच करायचा नाही जे जे सध्या होत आहे तेच मस्त एन्जॉय करायचे आपण ठरवलेले आहे त्यामुळे कोणतेही लॉजिक वापरण्याचे कष्ट पडायला नकोत. जे काही होतेय त्यालाच नशीब समजून जगण्यात मोठा आनंद असतो आता तोच उपभोगण्यात बहुतांश समाज मश्गुल आहे. सतत एकाच बाजूच्या विचारांचा मारा होत असला की तोच विचार उत्तम आणि जीवनदायी असल्याचा आभास निर्माण होतो गेल्या काही वर्षात हेच घडत आहे. दुसरी बाजू लोकांपर्यंत जाऊच नये याची काळजी घेणाऱ्या यंत्रणा मजबुतीने आपल्याच आजूबाजूला कार्यान्वित झाल्या आहेत.

तुम्हारे पाव के नीचे कोई जमीन नाही है
कमाल ये है के फिरभी तुम्हे यकीन नाही है

या शब्दात दुष्यन्तकुमार नावाच्या जास्त लोड घेणाऱ्या कवीने ही आजची अवस्था पन्नास वर्षांपूर्वीच हेरून ठेवली होती. कुणाच्याही पायाखाली आधार नाही पण त्याचा साधा मागमूसही या बेपर्वा घटकाला नाही याचे नवल तो व्यक्त करतोय. छानसा टाईमपास चालला आहे. काही लोक खूपच काळजी करतात अन काहींना आजूबाजूला घडणाऱ्या कोणत्याही घटनेबद्दल काहीही वाटत नाही परंतु दोघांचेही मजेत चालले आहे. काळजी करणारा,लोड घेणारा ,चिंतन करणारा आणि या सगळ्यांना फाट्यावर मारणारा मजेत आहे. दोन्ही प्रवृत्तीचा टाईमपास ठरलेला आहे . अज्ञानात सुख असते मात्र थोडीफार माहिती ठेवणारा भरडला जात आहे कारण त्याचे परिणाम काय होऊ शकतात याचा त्याला अंदाज आलेला असतो.

कुरुलकर नावाचा संरक्षण विषयक खात्यातील मोठा अधिकारी फारच देशभक्त,अगदी संघाचा कार्यकर्ता ,राष्ट्रभक्तीचे तरुणांना धडे देण्याचा अधिकारी मात्र तो कुण्या तरुणीच्या जाळ्यात अडकून देशाची गुपिते चक्क पाकिस्तानला देतो ,आपण अजूनही यात नेमके कुणाचे चुकले असावे बरे ? यावर खल करीत आहोत. पुन्हा त्याच्या मदतीला सगळे संघबंधू धावून येताना दिसतात ,कुरुलकर असे नसावेत नक्कीच त्यांना कुणीतरी फसवले असावे ? अशी बुद्धिभेद करणारी मुक्ताफळे उधळली जात आहेत. गल्लीपासून दिल्ली पर्यंत तुमचेच सरकार असताना तुम्ही बिच्चारा ठरवलेल्या कुरुलकरांना फसवणार कोण ? वरून आपण सगळे बीबीसी ( भयताड बहुजन कंपनी ) लोक डोक्याला अजिबात ताप द्यायचा नाही हे ठरवून बसलो आहोत. त्यामुळे टेन्शन नका घेऊ देशात,समाजात जे काय चाललेय ते मुकाटपणे चालू द्या .तुम्ही प्रवचनाची पहाटेची वेळ चुकू देऊ नका.

## संपादकीय »

### सरकार तरले पण...

***गेली वर्षभर ज्याची सरकारच्या शिरावर टांगती तलवार होती तो सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अखेर आज आला. पाच न्यायाधीशांच्या पीठाने सविस्तर निकाल देताना सरकार बनवताना झालेली घाई,राज्यपालांची भूमिका आणि प्रतोद नेमताना बाजूला सारलेले नियम यावर नेमके बोट ठेवत शिंदे- फडणवीस सरकारला मात्र व्यवस्थित तारण्याचे काम केले आहे.***

सेनेतील उठावाचा निकाल देताना केंद्रीय निवडणूक आयोगाने जो निर्णय जाहीर केला त्यातूनच पुढच्या निकालाचे खरंतर संकेत मिळाले होते. राजकारणात ज्याच्या हाती ससा तो पारधी समजण्याचा प्रघात आहे त्यामुळे सत्ताधारी पक्षाला निकालात फेवर करताना कोणतीही व्यवस्था कायद्याचे उल्लंघन करीत नसते केवळ त्याचा हवा तसा किस पाडला जातो आणि निर्णय कायद्याच्या भाषेत बसवून पक्के केले जातात. त्यामुळे सर्वोच्च नायायालयात या प्रकरणी निर्णय काहीही लागला तरी शिंदे सरकारला धक्का लागणार नाही याची या क्षेत्रातील जाणकारांना खात्री होती आणि घडलेही तसेच.


**जिल्ह्यात म्हैसपूरला झालेल्या विशाल शिवमहापुराण कथेचे सूप वाजले. ५ ते ११ मे दरम्यान झालेल्या या आयोजनात विदर्भ आणि मराठवाड्यातील लाखो भाविकांनी भाग घेतला. या आयोजनावर अंदाजे २० कोटी रुपयांची उलाढाल झाली. प्रारंभापासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या या आयोजनाला जिल्हा प्रशासनाने सामाजिक संघटनांच्या दबावाने बऱ्यापैकी नियंत्रित केले होते.**

## झोळ्या तुडुंब भरल्या, कथेचे कवित्व संपले!

पंडित प्रदीप मिश्रा यांनी या आधी मध्यप्रदेशात सिहोर येथे रुद्राक्ष घेण्यासाठी निमंत्रित केलेल्या लाखो भाविकांना जो त्रास झाला आणि त्यापैकी अनेक लोक मृत्युमुखी पडले त्या पृष्ठभूमीवर सामाजिक संघटनांनी दखल घेणे स्वाभाविक होते. एवढेच नव्हे तर प्रदीप मिश्रा संविधानाला विरोध केल्यामुळे अगोदरच अनेकांच्या रडारवर होते मात्र आधीचा गदारोळ बघता त्यांनी अकोल्यातील आयोजनात काळजी घेतली कोणतेही वादग्रस्त वक्तव्य न करता हळूच आपला कार्यभाग साधण्यात कोणतीही कमतरता त्यांनी सोडली नाही.

माध्यमांनी सुद्धा अतिशय संयम ठेवून या आयोजनाला भरपूर प्रसिद्धी दिली. आयोजकांनी कोट्यवधी रुपये विविध मार्गाने गोळा करूनही कोणत्याच माध्यमाला जाहिरातींचा रतीब घातला नसला तरी जिथे लाखो भाविक जमतात तेथील उपक्रमांची दखल घेतली पाहिजे हे कर्तव्य समजून सगळ्यांनी आपले रकाने भक्तीच्या रंगाने रंगवत आयोजनातील आपले योगदान निभावले. आमच्यासारख्य काही माध्यमांनी वास्तव मांडण्याचा प्रयत्न सुद्धा केला. धार्मिक आयोजनाचे स्वागत मात्र मंत्रतंत्र आवर या न्यायाने आम्ही लोक प्रबोधन सुरूच ठेवले होते. प्रदीप मिश्रा यांच्या म्हणण्यानुसार जिथे कथेचे आयोजन असते तिथे भगवान शंकर स्वतः विराजमान असतात मात्र या काळात कथा मंडपातून लाखो रुपयांच्या मंगळसूत्र,दागिने आणि मोबाईलवर चोरट्यांनी हात साफ केला तेव्हा भगवान शंकराच्या अवकृपेचा कोणत्याही चोरट्याला प्रसाद मिळू शकला नाही उलट पोलिसांना पुढे यावे लागले.

चाळीस एकराच्या या विशाल मंडपात एकाचवेळी चोरटे आणि महाराजांचे असंख्य भक्त लाखो भाविकांच्या खिश्यावर डल्ला मारताना दिसले. फरक एवढाच होता की चोरटे चोरून ऐवज नेट होते आणि झोळीधारी भक्त आवाहन करून भाविकांचा खिसा खाली करीत होते.




दररोज पाच लाख भाविक उपस्थित होते असा खुद्द आयोजकांचा दावा आहे हे जर खरे मानले आणि प्रत्येकाने झोळीत पाच रुपये टाकले . निम्मे भाविकांनी झोळीत पैसे टाकले असे जरी गृहीत धरले तरी दररोज एक कोटींच्या वर पैसा जमा होतो. असे सात दिवसाचे सरळ सात कोटी रुपये मध्यप्रदेशातील सिहोरला कुबेरेश्वर संस्थानला थेट गेल्याची माहिती आहे. झोळीत टाकलेल्या दानाची पावती नसते आणि अनेकदा हिशेबही दिला जात नाही त्यामुळे भगवान शिवाच्या नावावर तरी असा काळा व्यवहार टाळायला हवा किंवा झोळीत जमा झालेल्या रकमेचा हिशेब आयोजकांनी जाहीर करायला हवा.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बजरंगबलीनेच भाजपला केलं चारी मुंड्या चीत!

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा टोला

।छत्रपती संभाजीनगर। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

'कर्नाटकात भाजपची सत्ता होती. तेव्हा ४० टक्के कमिशनचा मुद्दा गाजला. निवडणुकीत देवाचे नाव वापरु नये, असा नियम आहे. मात्र, भाजपने कर्नाटक विधानसभा निवडणुकीत बजरंग बलींचे नाव पुढे केले. कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल पवनपुत्र हनुमान यांचा वार असलेला शनिवारीच लागला. निकालात बजरंग बलीनींच भाजपला चारी मुंड्या चीत केले आहे,' असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी लगावला.

### 'मीही दिला शब्द'

'काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना मी महाराष्ट्रात काँग्रेससाठी काम करण्याचा शब्द दिला आहे. आगामी काळातील निवडणुकांसाठी महाविकास आघाडीतील अन्य पक्षांशी चर्चा करून जागावाटपाचे योग्य ते सूत्र ठरविण्यात येईल. प्रत्येक निवडणुकांमध्ये यश मिळवण्याचा आमचा प्रयत्न असेल,' असे नाना पटोले यांनी स्पष्ट केले.



कर्नाटक विधानसभा निवडणूक निकालानंतर शनिवारी सायंकाळी पटोले शहरात आले. भडकलगेट येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर गुलमंडी येथील श्री क्षेत्र सुपारी हनुमान मंदिरात दर्शन घेतले आणि आरती केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले, 'कर्नाटकात काँग्रेसने महगाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न; तसेच नागरिकांना होत असलेल्या अडचणींचे प्रश्न उपस्थित केले. दुसऱ्या बाजूने पंतप्रधान जाहीर भाषणांमधून देवाचे नाव पुढे करीत होते. मात्र, कर्नाटकच्या जनतेने भाजपला जागा दाखवून दिली.' 'काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाला कर्नाटकातील जनतेने स्वीकारले आहे. भविष्यात देशात आणि महाराष्ट्रात असा विजय मिळविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,' असे त्यांनी नमूद केले.

या वेळी काँग्रेस शहराध्यक्ष शेख युसूफ, ॲड. सय्यद अक्रम, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशनचंद तनवाणी, माजी महापौर नंदकुमार घोडेले आदींची उपस्थिती होती.

# नवी मुंबईकर घामाघूम! दुपारच्या वेळेत अघोषित संचारबंदी

## मुंबईपेक्षाही तापमान अधिक, रस्त्यावर शुकशुकाट

।नवी मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

नवी मुंबईत आता कडक उन्हाळा जाणवू लागला असून सद्यस्थितीत सरासरी तापमान ४० अंश सेल्सिअस इतके असते. त्यामुळे नवी मुंबईकरांची काहिली वाढली आहे. दुपारच्या वेळी अघोषित संचारबंदीचे चित्र आहे. रस्त्यावर शुकशुकाट दिसून येतो. अनियंत्रित बांधकामे, नवीन प्रकल्प, सिमेंट-काँक्रिटीकरण, विमानतळ विकास, औद्योगिकीकरण आणि पदोपदी तयार होत असलेले सिमेंटचे जंगल या कारणांमुळे मुंबईपेक्षा नवी मुंबईतील तापमान कमीत कमी दोन ते चार अंश सेल्सिअसने जास्त असल्याचे निदर्शनास येत आहे.



या शहराची निर्मिती करताना सिडकोने कमी निसर्गसंपदा निर्माण केल्याने ही काहिली अधिक वाढू लागली आहे. सिडकोनंतर शहराचे पालकत्व स्वीकारलेल्या पालिकेनेही हा प्रश्न अद्याप गांभीर्याने घेतलेला नाही, असा अनेक पर्यावरण संस्थांचा अभिप्राय आहे. ठाणे खाडीकिनाऱ्यावरील मिठागरांच्या जमिनींवर मातीचा भराव टाकून तयार करण्यात आलेल्या नवी मुंबईच्या जमिनीवर आता उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. सात बेटांवर वसलेल्या मुंबईपेक्षा नवी मुंबईतील दुपारच्या वेळचे तापमान चार अंश सेल्सिअसने जास्त असते, असे बेलापूर येथील रहिवासी, पर्यावरण सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी सांगितले. महामुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. नवी मुंबई विमानतळासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले असून उलवा टेकडीची उंची आठ मीटरपर्यंत कमी करण्यात आली आहे.

विमानतळाच्या धावपट्टीसाठी एक हजार हेक्टर क्षेत्रात सपाटीकरण करण्यात आले. त्यासाठी कोट्यवधी टन क्युबिक टन मातीचा भराव टाकण्यात आला. जेएनपीटी विस्तारासाठीही खारफुटी बुजवून सपाटीकरण करण्यात आले आहे. ठाणे-बेलापूर, शीव-पनवेल आणि नवी मुंबई-उरण महामार्गाचे सिमेंट-काँक्रिटीकरण करण्यात आले. या सगळ्याचा परिणाम म्हणून तापमान पूर्वीपेक्षा वाढले आहे.

### आरोग्य धोक्यात

सायंकाळी आणि रात्रीदेखील हवा गरम असते. त्यामुळे यंदाचा उकाडा नवी मुंबईकरांना त्रासदायक ठरत आहे. ताप, घसादुखी, पोटदुखीचा त्रास होणारे रुग्ण वाढल्याचे खासगी, तसेच पालिकेचे डॉक्टर सांगत आहेत.

### काय काळजी घ्यावी?

दुपारी उन्हात फिरताना डोके झाकून घेणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये, म्हणून थोड्या-थोड्या वेळाने पाणी पिणे गरजेचे आहे. लिंबू, साखरपाणी प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी वाढते. उन्हाळ्यात थंड पेय, आइसक्रीम, बर्फाचा गोळा अशा पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढते. या पदार्थांमुळे तात्पुरते बरे वाटते; पण याचा दुष्परिणाम आरोग्यावर होतो. अतिथंड पदार्थांच्या सेवनामुळे घसा बसणे, खोकला होणे, असेही त्रास होत आहेत. दूषित पाणी प्यायल्यामुळे पोटदुखी, पोट बिघडण्याच्या तक्रारी वाढत आहेत. तहान जास्त लागली असली, तरीही पाणी पिताना काळजी घ्यायला हवी. घरातील स्वच्छ पाणी प्यावे, असा सल्ला डॉ. प्रतिक तांबे यांनी दिला. उन्हात अनेक जण आरोग्यांची काळजी घेताना मिनरल वॉटर विकत घेतात. सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या पाणपोईच्या ठिकाणी पाण्यासाठी असणारी फिल्टर मशिन किंवा थंड पाणी मिळत नसल्यामुळे अनेक जण मिनरल वॉटर घेऊन आपली तहान भागवत आहेत. त्यामुळे मिनरल वॉटरला मोठी मागणी आहे.

# कर्नाटकात भाजपाचा दारूण पराभव!

## कर्नाटक विधानसभेच्या 224 पैकी 135 जागांवर काँग्रेस पक्ष विजयी

। बंगळूरु । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आहे. या निवडणुकीत कोण बाजी मारणार? याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं होतं. आता कर्नाटक निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने भारतीय जनता पार्टी आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) या दोन प्रमुख राजकीय पक्षांना धोबीपछाड दिला आहे.**






कर्नाटक विधानसभेच्या २२४ पैकी १३५ जागांवर काँग्रेस पक्ष विजयी ठरला असून काँग्रेसने बहुमताचा आकडा पार केला आहे. तर सत्ताधारी भाजपाला केवळ ६५ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. जनता दल (सेक्युलर) पक्षालाही साजेशी कामगिरी करता आली नाही. २०१८ विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत जेडीएसची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. जेडीएसला केवळ १९ जागा जिंकता आल्या.

काँग्रेसने बहुमताचा आकडा पार केला असला तरी कर्नाटकचा आगामी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल? याबाबत काँग्रेसने अद्याप घोषणा केली नाही. माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि कर्नाटक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डीके शिवकुमार या दोन नेत्यांची नावं मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावर कुणाची वर्णी लागणार? याबाबत उत्सुकता कायम आहे. या दोन नेत्यांव्यतिरिक्त कर्नाटकमधील जवळपास दहा नेते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असल्याचं बोललं जातं आहे.

नरेंद्र मोदी म्हणाले, "कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी काँग्रेस पक्षाचं अभिनंदन. जनतेच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी मी त्यांना सदिच्छा देतो."

मोदींनी आणखी एक ट्वीट करत कार्यकर्त्यांनाही संबोधित केलं. "कर्नाटक निवडणुकीत ज्यांनी पाठिंबा दिला त्या सर्वांना धन्यवाद. भाजपा कार्यकर्त्यांनी निवडणुकीत केलेल्या कष्टाचं मी कौतुक करतो. आम्ही आगामी काळात कर्नाटकच्या जनतेची अधिक जोमाने सेवा करू," असं मोदींनी नमूद केलं.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले...

**कर्नाटक विधानसभा निवडणूक केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या भाजपा आणि विरोधी पक्षात असलेल्या काँग्रेसने प्रतिष्ठेची केली. या निवडणुकीत भाजपाच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांपासून अनेक मंत्री आणि मुख्यमंत्री कर्नाटकात तळ ठोकून होते. दुसरीकडे काँग्रेसच्या प्रचारासाठी सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधींपासून काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते होते. अखेर शनिवारी (१३) या चुरशीच्या लढतीचा निकाल लागला. यात काँग्रेसने भाजपाचा दारूण पराभव केला. यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिली प्रतिक्रिया दिली. त्यांनी ट्वीट करत आपली भावना व्यक्त केली.**

### कर्नाटक विधानसभा निकालानंतर राहुल गांधींची प्रतिक्रिया

कर्नाटक विधानसभा निकालानंतर राहुल गांधी म्हणाले, "मी सर्वात आधी कर्नाटकच्या जनतेला, काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांचं अभिनंदन करतो. कर्नाटक निवडणुकीत एका बाजूला भांडवलशाहीची ताकद होती आणि दुसरीकडे गरीब जनतेची शक्ती होती. या गरीब जनतेच्या शक्तीने भांडवलशाहीचा पराभव केला. हेच प्रत्येक राज्यात होईल. काँग्रेस कर्नाटकात गरीबांबरोबर उभा राहिला. आम्ही गरीबांच्या मुद्द्यावर निवडणूक लढवली."

### "कर्नाटकात द्वेषाचा बाजार बंद झालाय"

"मला सगळ्यात जास्त ही गोष्ट आवडली की आम्ही द्वेषाने, चुकीच्या शब्दांनी ही लढाई नाही लढली.

आम्ही प्रेमाने ही लढाई लढलो. कर्नाटकात द्वेषाचा बाजार बंद झालाय आणि प्रेमाची दुकानं उघडली गेली आहेत.

---

# लोकसभा पोटनिवडणुकीत जालंधरमध्ये 'आप' विजयी!

## विधानसभा पोटनिवडणुकांत उत्तर प्रदेशातील दोन्ही जागा अपना दलाकडे

। चंडीगड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंजाबमधील जालंधर लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक आम आदमी पक्षाने जिंकली आहे. विधानसभांसाठी चार ठिकाणी झालेल्या पोटनिवडणुकांत उत्तर प्रदेशात दोन्ही जागांवर भाजपच्या मित्रपक्षाने विजय मिळवला. ओडिशातील पोटनिवडणुकीत बिजू जनता दलाने जागा कायम राखली असून, मेघालयमधील पोटनिवडणुकीत यूडीपीचा उमेदवार विजयी झाला आहे. या सर्व जागांचे निकाल मतमोजणीनंतर शनिवारी जाहीर झाले.**

जालंधर लोकसभा मतदारसंघात 'आप'चे उमेदवार सुशील रिंकू यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी व काँग्रेस उमेदवार करमजित कौर चौधरी यांचा ५८,६९१ मतांनी पराभव केला. रिंकू यांना ३,०२,२७९ मते, तर चौधरी यांना २,४३,५८८ मते मिळाली. बसपचा पाठिंबा असलेले शिरोमणी अकाली दलाचे उमेदवार १ लाख ५८ हजार मतांसह तिसऱ्या, तर भाजपचे इंदर इक्बालसिंग अटवाल हे १ लाख ३४ हजार मतांसह चौथ्या स्थानावर राहिले. ही जागा 'आप'ने काँग्रेसकडून हिसकावून घेतली.



उत्तर प्रदेशातील छानबे (राखीव) व सुआर या दोन्ही मतदारसंघांत भाजपचा मित्रपक्ष असलेल्या अपना दल (सोनेलाल) या पक्षाने विजय मिळवला. छानबे मतदारसंघात रिंकी कोल यांनी समाजवादी पक्षाचे कीर्ती कोल यांना ९,५८७ मतांनी हरवले. रिंकी कोल यांना ७६,२०३, तर कीर्ती कोल यांना ६६,६१६ मते मिळाली. काँग्रेसचे अजय कुमार यांना 'नोटा'ला मिळालेल्या (१.५१ टक्के) मतांपेक्षा थोडी जास्त, म्हणजे फक्त १.५६ टक्के मते मिळवता आली.


सुआर मतदारसंघात अपना दलाच्या शफीक अहमद अन्सारी यांचा ८,७२४ इतक्या मताधिक्याने विजय झाला. त्यांना ६८,६३० मते, तर समाजवादी पक्षाच्या अनुराधा चौहान यांना ५९,९०६ मते मिळाली.

ओडिशातील सत्ताधारी बिजू जनता दलाने झारसुगुडा विधानसभा पोटनिवडणुकीत जागा कायम राखली. या पक्षाच्या उमेदवार दीपाली दास यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपचे टंकधर त्रिपाठी यांचा ४८,७२१ मतांनी पराभव केला.

मेघालयमध्ये युनायटेड डेमॉक्रॅटिक पार्टीचे (यूडीपी) उमेदवार सिंशर कुपर रॉय थाबाह यांनी सोहिआँग मतदारसंघात नॅशनल पीपल्स पार्टीचे (एनपीपी) सामलिन मालंगिआंग यांचा ३४०० मतांनी पराभव केला.

# काहीतरी नवं येतंय! अश्विनी भावे-अजिंक्य देव 25 वर्षांनी एकत्र..

अश्विनी भावे हे सिनेसृष्टीतील एक नावाजलेलं नाव. गेली २ दशके त्या चित्रपट क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांनी केलेल्या सर्वच भूमिका या रसिकप्रेक्षकांच्या मनात अजूनही जिवंत आहेत. फक्त मराठीतच नाही तर त्यांच्या कलाकृतीने बॉलीवूड मध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. बॉलीवूडच्या बड्या बड्या स्टार्ससोबत त्यांनी काम केलं आहे. फक्त फॅन्सच नाहीतर चित्रपट समीक्षकांनाही त्यांच्या कामाची नेहमीच तारीफ केली आहे. आज अश्विनी भावे यांनी अजिंक्य देव यांच्यासोबत फोटो शेयर करत खास पोस्ट लिहिली आहे. अभिनेत्री अश्विनी भावे यांनी एके काळी मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. 'सरकारनामा',



'धाकडेबाज', 'बनवाबनवी', 'हळद रुसली, कुंकू हसलं', वजीर असे अनेक चित्रपट त्यांनी हिट केले आहे. अभिनेते अजिंक्य देव यांच्यासोबतचा 'सरकारन नामा' हा चित्रपट विशेष गाजला. या चित्रपटाला जवळपास २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. आता २५ वर्षांनी अश्विनी आणि अजिंक्य पुन्हा एकत्र येत आहे. अश्विनी भावे यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये अश्विनी आणि अजिंक्य एक देव एकत्र आहेत. या शूटिंग लोकेशनवर.

या फोटोला कॅप्शन देताना अश्विनी म्हणाल्या, 'सरकारनामा' या चित्रपटाचे रौप्य महोत्सवी वर्ष आम्ही साजरा करत आहोत. अशातच मी आणि अजिंक्य आम्ही एकत्र पुन्हा चित्रीकरण करत आहोत, तेही २५ वर्षांनी..' त्यांच्या या पोस्टने चांगलीच उत्सुकता वाढवली आहे. आता नवीन काय पाहायला मिळणार याचे वेध चाहत्यांना लागले आहे.

# हुमा कुरेशीने घातला ब्रालेस ड्रेस, या टीव्ही अभिनेत्याला उगाच झोंबली मिरची, म्हणाला-

मुंबई- हुमा कुरेशीने अलीकडेच 'दहाड'च्या स्क्रिनिंगला हजेरी लावली. सोनाक्षी सिन्हाच्या वेब सीरिजच्या स्क्रिनिंग इव्हेंटमध्ये अभिनेत्रीने ब्रालेस ड्रेस घातला होता, ज्यामुळे सोशल मीडिया तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं. त्याचवेळी, टीव्ही अभिनेता पंकित ठक्करनेही हुमाला फटकारले आहे. तसेच, सार्वजनिक कार्यक्रमात असे कपडे घालणे 'अशोभनीय आणि अयोग्य' असल्याचं तो म्हणाला.

## हुमा कुरेशीच्या निर्भीड लूकवर गोंधळ

टेलिव्हिजन अभिनेता पंकित ठक्करने एका मुलाखतीत हुमा कुरेशीच्या 'दहाड' स्क्रिनिंग आउटफिटची खिल्ली उडवली आणि तो म्हणाला की, 'भारतीय चित्रपट उद्योगातील एक सेलिब्रिटी म्हणून मी रेड



कार्पेटवर आणि बाहेर अनेक फॅशनचे क्षण पाहिले आहेत. अलीकडेच एका सार्वजनिक कार्यक्रमात दोन अभिनेत्रींनी माझे लक्ष वेधून घेतले, त्या म्हणजे हुमा कुरेशी आणि सोनाक्षी सिन्हा. दोन्ही अभिनेत्री आपापल्या लूकमध्ये सुंदर दिसल्या, पण हुमा कुरेशीचा बोल्ड लूक मला आवडला नाही, विशेषतः भारतासारख्या रूढिवादी समाजात.'

पंकित ठक्कर पुढे म्हणाला की, 'हुमाने तिचं शरीर निर्लज्जपणे दाखवलं जे रूढीवादी भारतीय विचारसरणीशी सुसंगत नव्हते. भारतीय संस्कृतीतील नैतिक मूल्ये आणि शिष्टाचार लक्षात घेऊन सार्वजनिक कार्यक्रमात असे कपडे घालणे अशोभनीय आणि अयोग्य होते. असे कपडे घातल्यावर पारंपरिक भारतीय मूल्यांचा अनादर केल्याची छाप पडते. हुमाने 'दहाड'च्या स्क्रिनिंगवेळी नेकलाइन असलेला प्रिंटेड ड्रेस घातला होता, जे पाहून नेटकऱ्यांनी तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल केलं होतं.

# मनीष मल्होत्राची बर्थ डे पार्टी अन् रेखा नवरीसारखी सजली...

बॉलिवूड मधील प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राने 5 नोव्हेंबरला त्यांचा 56 वा वाढदिवस साजरा केला. या खास दिवशी मनीषने त्याच्या घरी एक मोठी पार्टी दिली, ज्यामध्ये संपूर्ण बॉलिवूडकरी उपस्थित होते. त्याचवेळी या पार्टीचे व्हिडीओ समोर आले आहेत, जे पाहून चाहते आनंदीत झाले आहे. मात्र या पार्टीत मनीषची नव्हे तर रेखाचीच चर्चा जास्त रंगली आहे.

या पार्टीत जवळपास सर्वच बॉलिवूडच्या अभिनेत्रींनी हजेरी लावली होती.सोशल मीडियावर या पार्टीचे काही फोटो शेअर व्हायरल होत आहे. या फोटोंमध्ये रवीना टंडन खूपच कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. मात्र रेखा पार्टीत पोहोचली तेव्हा तिचं सुंदर रूप सगळ्यांना भुरळ पाडायला पुरेसे होतं. सर्वात उठून दिसत होती ती एव्हरग्रीन रेखा.

रेखाने या पार्टीसाठी सोनेरी रंगाचा अनारकली कुर्ता निवडला होता. ज्याच्या कुर्त्यात गोल्डन गोटा वर्क केलेलं होतं. तिच्या कुर्त्यावर सोनेरी जरीचे वर्क होते. रेखाने सोनेरी रंगाच्या कुर्त्यासोबत हेवी ज्वेलरी मॅच केली. हेवी सोनेरी कानातले आणि नेकपीस सोबतच रेखाने तिला पूर्णपणे पारंपारिक लूक दिसावा यासाठी मांगटिका देखील घातला होता. त्याचबरोबर कपाळावर टिकली आणी मरून रंगाची डार्क लिपस्टिक लावायली होती आणि केसांचा जूडा बनवला होता. ज्यावर गजरा सुंदर दिसत होता. इतकच नाही तर रेखाच्या या सर्व गोल्डन लूकबरोबर तिने उंच टाचांच्या सँडलने सर्वांच लक्ष वेधले. रेखाने या कुर्त्यासोबत मॅचिंग स्ट्रेपी हील्स घातल्या होत्या. ज्यामध्ये टाचांची उंची खूप जास्त होती आणि सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. रेखा अनेकदा पारंपारिक लूकमध्ये सर्वांचे लक्ष वेधते.



# अक्षया-हार्दिकच्या लव्ह स्टोरीत अभिनेत्याची आई ठरली खरी नायिका

**अभिनेत्री अक्षया देवधर आणि हार्दिक जोशी या जोडीने 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेत अंजली बाई आणि राणा दा बनून प्रेक्षकांचे मन जिंकले होते. त्यानंतर खऱ्या आयुष्यातही ही जोडी एकत्र आली आणि प्रेक्षकांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. अक्षया आणि हार्दिक यांनी ०२ डिसेंबर २०२२ रोजी लग्नगाठ बांधली. मात्र तुम्हाला माहीत आहे का या जोडप्याची लव्ह स्टोरी कशी आणि कोणामुळे रुळावर आली? आज अक्षयाच्या वाढदिवशी जाणून घेऊय टेलिव्हिजनच्या या लोकप्रिय जोडप्याची रोमँटिक प्रेमकहाणी...**



मालिकेनंतर या दोघांचे सूत जुळले होते. या मालिकेच्या शूटिंगदरम्यान दोघेही जवळपास ५ वर्षे एकत्र होते आणि त्यामुळे त्यांच्या घनिष्ठ अशी मैत्री झाली. शिवाय एकमेकांच्या कुटुंबामध्येही त्यांची चांगलीच ओळख झाली होती. हार्दिकने एका मुलाखतीत अशी प्रतिक्रिया दिलेली की त्याच्या डोक्यात दोघांविषयी असा काही विचार आला नव्हता, पण आईच्या हट्टापायी या दोघांनी एकमेकांचा विचार केला. 'हर हर महादेव' सिनेमाच्या प्रमोशनदरम्यान हार्दिक 'बस बाई बस' या कार्यक्रमात बोलत होता. तेव्हा त्याने नेमकी कुठून सुरुवात झाली, याविषयी सांगितले.

# हैदराबादच्या मैदानात राडा!

## पंचांच्या निर्णयानंतर SRH vs LSG मॅच एका चेंडूमुळे थांबवली

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**हैदराबादच्या मैदानात चाहत्यांनी जोरदार राडा घातला. हैदराबादच्या चाहत्यांनी यावेळी लखनौ सुपर जायंट्सच्या डग आऊटवर काही गोष्टी फेकल्या आणि त्यामुळे सामना थांबवावा लागला. कारण पंचांना जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा त्यांनी हा सामना थांबवण्याचा निर्णय घेतला होता. जवळपास ५-१० मिनिटे सामना थांबवण्यात आला आणि सारेकाही आलबेल झाल्यावर पुन्हा सामना सुरु करण्यात आला.**



### नेमकं घडलं तरी काय...

ही गोष्ट घडली १९ व्या षटकात. त्यावेळी लखनौचा अवेश खान हा गोलंदाजी करत होता, तर त्याचा सामना हा हैदराबादचा अब्दूल समद करत होता. या चेंडूवर समद मोठा फटका मारण्यासाठी गेला. पण हा चेंडू फुलटॉस होता आणि चांगल्यच उंचीवर त्यामुळे मैदानातील पंचांनी तो नो बॉल दिली होता. पण हा निर्णय योग्य नसल्याचे लखनौच्या संघाला वाटले. त्यामुळे लखनौच्या संघाने यावेळी पंचांच्या निर्णयाविरोधात दाद मागण्याचे ठरवले आणि त्यांनी डीआरएस घेतला. त्यानंतर हे प्रकरण तिसऱ्या पंचांकडे गेले. तिसऱ्या पंचांनी रिप्ले पाहिला आणि हा चेंडू नो बॉल नसल्याचा निर्णय त्यांनी दिला. जेव्हा फलंदाज क्रिझमध्ये होता तेव्हा चेंडू नेमका कोणत्या उंचीला होता हे पाहिले गेले. पण त्यावेळी चेंडू हा स्टम्पच्या वरून जात असल्याचे दिसत होते. त्यामुळे हैदराबादच्या संघाने यावेळी नाराजी दर्शवली. खासकरून फलंदाज समद हा या निर्णयावर चांगलाच नाराज होता. हा रिप्ले चाहत्यांनीही मैदानातील स्क्रीनवर पाहिला. त्यामुळे नेमकं काय घडलं हे त्यांवाही समजलं होतं. त्यामुळे चाहत्यांनीही यावेळी नाराजी दर्शवली.

पण ही नाराजी दर्शवताना त्यांनी एक वाईट कृत्य केले आणि त्याचे समर्थन कोणीही करणार नाही. कारण चाहत्यांनी यावेळी एक काचेसारखी दिसणारी कठीण गोष्ट लखनौच्या खेळाडूच्या अंगावर फेकली. या गोष्टीची तक्रार पंचांकडे करण्यात आली आणि त्यामुळे हा सामना थांबवला गेला.

पंचांनी या गोष्टीची सखोल चौकशी केली आणि त्यामुळेच सामना थांबवण्यात आला होता. पण पंचांनी ही गोष्ट पाहिली आणि सारेकाही सुरळीत करत त्यांनी सामना सुरु केल्याचे पाहायला मिळाले.

---

## किती वेळा मन जिंकशील सूर्या?
## शतकी खेळीनंतर पत्नीला ट्रोल करणाऱ्यांना दिली चांगलीच चपराक

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

सूर्यकुमार यादवने १२ मे ला गुजरात टायटन्सविरुद्ध धडाकेबाज शतक झळकावले. सूर्याच्या या दमदार खेळीने सगळ्यांनाच पुन्हा एकदा मंत्रमुग्ध केले. त्याने ४९ चेंडूत नाबाद १०३ धावांची खेळी करत मुंबईला २७ धावांनी विजय मिळवून देण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. आयपीएलमधील हे सूर्याचं पहिलं आणि टी-२० क्रिकेटमधलं चौथे शतक आहे. सूर्याने हे शतक तर झळकावलेच, पण शतक झळकावल्यानंतर जे लोक त्याची पत्नी देविशाला ट्रोल करत होते, अशा लोकांनाही चांगलीच चपराक लगावली. खुद्द सूर्याने याबद्दल माहिती दिली आहे. आयपीएलने सूर्याचा एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये मुंबईचा गोलंदाज आकाश मधवाल त्याच्या झंझावाती खेळीबद्दल त्याच्याशी बोलत आहे. आकाशने सूर्याला विचारले की हे त्याचे पहिले आयपीएल शतक आहे आणि यावेळी त्याचे कुटुंब देखील स्टेडियममध्ये उपस्थित होते. वहिनी (देविशा शेट्टी) पण बसली होती, मग तुला कसं वाटतंय?

### सूर्याने पाहा काय दिलं उत्तर

**सूर्या म्हणाला की संपूर्ण कुटुंबाला पाहून खूप आनंद झाला. विशेषत: देविशा, कारण ती माझी तिन्ही आंतरराष्ट्रीय टी-२० शतके पाहू शकली नाही. त्यावेळेस ती सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये नव्हती. पण यावेळेस देविशा स्टेडियममध्ये होती आणि पत्नीसमोर शतक झळकावले हे पाहून बरे वाटले, असे या तुफानी फलंदाजाने सांगितले. आता देविशा स्टेडियममध्ये सामना पाहायला आली आणि त्यामुळे मी शतक झळकावू शकलो नाही, असे म्हणण्याची संधी आता कोणाला मिळणार नाही.**

---

## सचिन तेंडुलकरची मोठी फसवणूक!

### मास्टर ब्लास्टरची मुंबई क्राईम ब्रँचकडे तक्रार

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**IPL मध्ये मुंबई इंडियन्स संघाचा आयकॉन आणि माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर सध्या मुंबई इंडियन्सच्या सामन्यांमध्ये उपस्थिती लावताना दिसत आहे. याच दरम्यान एक मोठी माहिती समोर येत आहे. सचिन तेंडुलकरने मुंबई गुन्हे विभागात गुन्हा दाखल केला आहे. याची माहिती खुद्द सचिन तेंडुलकर यानेच दिली आहे. सचिन तेंडुलकरने गुरुवारी तक्रार नोंदवली. मुंबई क्राइम ब्रँचच्या सायबर सेलमध्ये हा गुन्हा दाखल झाला आहे..**



### इंस्टाग्राम अकाऊंटवरून सुद्धा दिली माहिती

**सचिन तेंडुलकरने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून सुद्धा याची माहिती दिली आहे. सचिनने एक पोस्ट शेअर केली आहे, त्यामध्ये त्याने या सगळ्या घडलेल्या प्रकाराची आणि तक्रार केल्याचीही माहिती सविस्तरपणे दिली आहे आणि सर्वांना सतर्क राहण्यास सांगितले आहे.**

खोट्या आणि बनावट जाहिरातींमध्ये सचिनचे नाव वापरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सचिनच्या नावाचा वापर करून लोकांची फसवणूक केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. इंटरनेटवरील अनेक बनावट जाहिरातींमध्ये नावासह फोटो आणि आवाजाचा गैरवापर होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्याच्या नावाचा वापर करून लोकांची फसवणूक केली जात आहे. रिपोर्टमध्ये दिलेल्या माहितीप्रमाणे त्या बनावट जाहिरातींमध्ये असेही म्हटले जात आहे की जर कोणी त्यांचे प्रॉडक्ट खरेदी केले तर त्यांना सचिन तेंडुलकरची स्वाक्षरी असलेली जर्सी दिली जाईल. मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने तपास सुरू केला आहे. रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, एक जाहिरात पाहिली होती जी तेल कंपनीची आहे, ज्यामध्ये सचिन तेंडुलकरचा फोटो लावला आहे आणि त्यासोबत क्रिकेटर सचिनने या उत्पादनाची शिफारस केली असल्याचे लिहिले आहे. फेसबुक आणि इंस्टाग्रामवर या जाहिराती पाहण्यात आल्या आहेत. सचिन तेंडुलकर जाहिरातींमध्ये दाखवल्याप्रमाणे अशा कोणत्याही उत्पादनाला मान्यता देत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. यामध्ये सचिनचा आवाजही वापरण्यात आला आहे. आयपीसी कलम ४२०, ४६५ आणि ५०० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.